# सोलापूर विद्यापीठ

सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

# SOLAPUR UNIVERSITY

Solapur Pune National Highway,
Kegaon,
Solapur - 413 255 (Maharashtra)
Phone / Fax: 091-0217-2744770


संदर्भ : सोविसो/सांख्यिकी/अंतनिस/२०१५-१६/ 262 दिनांक : 10 APR 2015

प्रति,
**मा. प्राचार्य / प्राचार्या,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
सोलापूर विद्यापीठ,
**सोलापूर**

**विषय : विद्यापीठातील सर्व लैंगिक छळ प्रतिबंध समित्या बरखास्त करून अंतर्गत तक्रार निवारण समिती गठित केल्याबाबत..**

संदर्भ : १) केंद्रशासनाचा कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून स्वरंक्षण अधिनियम - २०१३
२) महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक दि. १९/०६/२०१४

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयी संदर्भीय अधिनियम व शासन निर्णयानुसार विद्यापीठ पातळीवरील कार्यरत असलेली लैंगिक छळ प्रतिबंध समिती, विद्यापीठ कार्यालयीन कर्मचारी लैंगिक छळ प्रतिबंध समिती व विद्यापीठ पदव्युत्तर संकुलाकरीता असलेली लैंगिक छळ प्रतिबंध समिती या सर्व समित्या बरखास्त करून दि. २३ जुलै, २०१४ रोजीच्या परिपत्रकान्वये नवीन "अंतर्गत तक्रार निवारण समिती" खालीलप्रमाणे स्थापन करण्यात आली आहे.

| अ.क्र. | अंतर्गत तक्रार निवारण समिती | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती ज्योती डी. ठेंगे | अध्यक्षा | सहायक प्राध्यापक,<br>संगणकशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| २) | श्रीमती लता व्ही. फुटाणे | सदस्या | माजी नगरसेविका,<br>विठाई निवास, भवानी पेठ, मराठा वस्ती, सोलापूर |
| ३) | ॲड. जावेद एम. खैरदी | सदस्य | कायदा अधिकारी,<br>सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| ४) | डॉ. सौ. सुनिता गायकवाड | सदस्या | डॉ. गायकवाड हॉस्पिटल, मु.पो.कडलास, ता.सांगोला<br>माजी अध्यक्ष, महिला जिल्हा कॉंग्रेस कमिटी |
| ५) | श्रीमती अर्चना बी. चोपडे | सदस्य-सचिव | सहायक कुलसचिव,<br>सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |

तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (su.digitaluniversity.ac.in) **Safety & Security of Girls & Women** या मथळयाखाली केंद्रशासनाचा कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून स्वरंक्षण अधिनियम - २०१३, विशाखा जजमेंट, सर्व शासन निर्णय, विद्यापीठाचे सर्व परिपत्रक आणि लैंगिक छळ झाल्याबाबत तक्रार करण्याचा अर्जाचा नमूना इ. उपलब्ध करून देण्यात आला आहे.

तरी उक्तबाब आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(एस. के. माळी)
कुलसचिव